## लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ रशियाच्या दौऱ्यावर

**नवी दिल्ली:** भारत आणि रशिया यांच्यातील दीर्घकालीन संरक्षण भागीदारी आणि लष्करी सहकार्य अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ १६ ते १८ सप्टेंबर २०२६ दरम्यान रशियाच्या अधिकृत दौऱ्यावर रवाना झाले आहेत. या उच्चस्तरीय दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध आणखी दृढ होण्याची अपेक्षा वर्तवली जात आहे. रशियात पोहोचल्यानंतर लष्करप्रमुखांना समारंभपूर्वक मानवंदना (गार्ड ऑफ ऑनर) दिली जाईल.


# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी


## बिहारमध्ये 50 लाख लोक पुराच्या विळख्यात,

**मुंबई :** देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पाऊस आणि पुरामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. बिहारमधील १५ जिल्ह्यांतील ५७५ पंचायतींमधील अंदाजे ५० लाख लोक अजूनही पुराच्या पाण्याने प्रभावित झाले आहेत. दरम्यान, हवामान विभागाने बिहारमधील २६ जिल्ह्यांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. काही भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशाराही देण्यात आला आहे. पूरग्रस्त भागात केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय पथक आज नुकसानीचा आढावा घेण्यासाठी दौरा करणार आहे.


छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १४७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## थोडक्यात वार्ता

### 160 कोटींच्या घोटाळ्यात उपासनीला तिसऱ्यांदा धक्का, जामीन अर्ज फेटाळला

**नाशिक :** नाशिकमधील तब्बल १६० कोटी रुपयांच्या शालार्थ घोटाळ्याप्रकरणी राज्य शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष आणि मुख्य संशयित नितीन मुरलीधर उपासनी यांच्या अडचणी कायम आहेत. नाशिकरोड सत्र न्यायालयाने उपासनी यांचा जामीन अर्ज तिसऱ्यांदा फेटाळून लावला आहे. त्यामुळे त्यांचा नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातील मुक्काम कायम राहणार आहे. दरम्यान, या प्रकरणातील दुसरे संशयित आणि माजी शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर यांच्या जामीन अर्जावर २८ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

बनावट नियुक्ती आदेशांचा आरोप : तपासात या घोटाळ्यात शिक्षण विभागातील एकाच जावक (आऊटवर्ड) क्रमांकाचा गैरवापर करून वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावाने बनावट नियुक्ती आदेश जारी केल्याचे समोर आले आहे. तपासादरम्यान तब्बल १२४ प्रकरणांमध्ये अधिकृत प्रशासकीय नोंदी आणि प्रत्यक्ष सिस्टीममधील डेटामध्ये मोठी तफावत आढळून आली. शासकीय कागदपत्रांमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने फेरफार करून सरकारची सुमारे १६० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप या प्रकरणात आहे.

### मराठा-कुणबी नोंदी शोधणाऱ्या शिंदे समितीला मंत्रालयात कार्यालय

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर मराठा-कुणबी नोंदींचा शोध आणि आरक्षणाशी संबंधित न्यायालयीन कामकाज अधिक सुलभ करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीला मंत्रालयातील नवीन प्रशासकीय भवनात स्वतंत्र जागा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. समितीसोबतच मराठा आरक्षण कक्षालाही याच जागेतून कामकाज करता येणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने हा निर्णय घेतला आहे. नवीन प्रशासकीय भवनाच्या १२व्या मजल्यावरील पश्चिम बाजूस ऊर्जा विभागाला देण्यात आलेली जागा आता निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती आणि मराठा आरक्षण कक्षाला देण्यात आली आहे. या जागेचे क्षेत्रफळ कागदोपत्री ९६४.४४ चौरस फूट असून प्रत्यक्षात ७७५ चौरस फूट जागा उपलब्ध आहे. या ठिकाणाहून कुणबी नोंदींचा शोध घेण्याबरोबरच मराठा आरक्षणासंदर्भातील न्यायालयीन लढ्याशी संबंधित कामकाज केले जाणार आहे. शिंदे समितीला जागा उपलब्ध झाल्यामुळे मराठा समाजातील अर्जदारांना कुणबी नोंदींच्या शोधासंदर्भातील कामकाजासाठी अधिक सुलभता होण्याची अपेक्षा आहे. समितीच्या कामकाजासाठी स्वतंत्र प्रशासकीय व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा हा निर्णय असल्याचे सरकारच्या आदेशातून स्पष्ट होते.

### डेंग्यूचा धोका होणार कमी? भारताची स्वदेशी 'DengiAll' लस 2027 मध्ये येण्याची शक्यता

**मुंबई :** पावसाळा सुरू झाला की भारतात डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढताना दिसतो. ताप, अंगदुखी, अशक्तपणा आणि प्लेटलेट्स कमी होणे यांसारख्या लक्षणांमुळे अनेक रुग्णांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करावे लागते. अशातच डेंग्यूविरोधातील लढाईत भारतासाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. भारतात विकसित होत असलेली स्वदेशी डेंग्यू लस 'Den-giAll' लवकरच उपलब्ध होण्याची शक्यता आहे. ही लस ICMR अर्थात भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या पुढाकारातून विकसित केली जात आहे. सध्या तिच्या क्लिनिकल चाचण्या सुरू असून, त्या यशस्वी झाल्यानंतर आवश्यक नियामक मंजुरी मिळाल्यास २०२७ पर्यंत ही लस सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

### "शाल जोडे"




# एसटी आरक्षणासाठी बंजारा समाजाचा जिंतूरमध्ये एल्गार

## हजारो समाजबांधवांचा मोर्चात सहभाग; व्यापाऱ्यांचा दुपारपर्यंत बंदला प्रतिसाद




**जिंतूर :** बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात आरक्षणाचा लाभ मिळावा, या मागणीसाठी बुधवारी जिंतूर शहरात बंजारा समाजाच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला. हजारो समाजबांधवांसह महिलांनीही मोठ्या संख्येने सहभागी होत आरक्षणाच्या मागणीला जोरदार पाठिंबा दिला. आरक्षणाच्या मागणीसह गेल्या काही दिवसांपासून उपोषण करणारे विनोद आडे यांच्या आंदोलनाची शासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्यापासून मोर्चाला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज चौक, येलदरी कॉर्नर, मेन चौक, पोलिस ठाण्यासमोरून मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. यावेळी महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांसह समाजातील विविध घटक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चामुळे शहरातील प्रमुख मार्गांवर बंजारा समाजाच्या एकजुटीचे चित्र दिसून आले. तहसील कार्यालयात तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर मोर्चेकरी पुन्हा वसंतराव नाईक पुतळा परिसरात परतले.

बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात आरक्षण मिळावे, या मागणीसाठी विनोद आडे यांनी ५ सप्टेंबरपासून जिंतूर येथे उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाची शासनाने तातडीने दखल घेऊन मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी केली.

निवेदनात गोर बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी प्रशासकीय, कायदेशीर व घटनात्मक कार्यवाही तातडीने करण्याची मागणी करण्यात आली. तसेच न्यायमूर्ती तहिलयानी यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या कामकाजाची सद्यस्थिती, अहवाल शासनाला सादर झाला आहे किंवा नाही, तसेच त्यानंतर झालेली कार्यवाही याबाबत अधिकृत माहिती समाजास देण्याची मागणी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या समाजबांधवांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत आणि पात्र कुटुंबीयांना शासकीय नोकरी देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली.

*व्यापाऱ्यांचा बंद; आंदोलनाला उत्स्फूर्त साथ*

बंजारा समाजाच्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर जिंतूर शहरातील व्यापाऱ्यांनी दुपारपर्यंत आपापली आस्थापने बंद ठेवून आंदोलनाला प्रतिसाद दिला. व्यापाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल बंजारा समाजाच्या आंदोलकांनी व्यापारी बांधवांचे आभार मानले.

*महिलांची लक्षणीय उपस्थिती*

एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी काढण्यात आलेल्या मोर्चात महिलांचा लक्षणीय सहभाग राहिला. मोठ्या संख्येने महिला मोर्चात सहभागी झाल्याने आरक्षणाच्या मागणीला व्यापक सामाजिक पाठिंबा असल्याचे चित्र जिंतूरमध्ये पाहायला मिळाले.

*बारा दिवसांपासून उपोषण*

एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी विनोद आडे यांनी ५ सप्टेंबरपासून वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात उपोषण सुरू केले आहे. उपोषणाची तातडीने दखल घेऊन शासनाने आरक्षणाच्या मागणीवर ठोस कार्यवाही करावी, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी केली.

# मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठीच्या आंदोलनाला भुमरेंचा पाठिंबा

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील धरणे आंदोलनाला भेट




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी मराठवाडा समन्यायी पाणी वाटप संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या धरणे आंदोलनाला खासदार संदिपान भुमरे यांनी बुधवारी भेट देऊन पाठिंबा दर्शविला. यावेळी त्यांनी आंदोलकांशी संवाद साधत मराठवाड्याच्या पाणी प्रश्नावरील मागण्या आणि भूमिका जाणून घेतल्या.

मराठवाड्याला मंजूर असलेले हक्काचे पाणी तातडीने उपलब्ध करून द्यावे, नदीजोड प्रकल्पाचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे सुरू करावे, प्रलंबित धरणे व जलप्रकल्पांची कामे गतीने पूर्ण करावीत, तसेच सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी यावेळी मांडल्या.

मराठवाड्याच्या पाणी प्रश्नाची तीव्रता आणि नागरिकांच्या भावना शासन स्तरावर प्रभावीपणे मांडण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असे खासदार भुमरे यांनी सांगितले. आंदोलकांच्या मागण्या शासनाच्या निदर्शनास आणून देत आवश्यक त्या पातळीवर पाठपुरावा आणि समन्वय साधला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

सिंचनाचा अनुशेष, अपुरा पाणीपुरवठा आणि रखडलेले जलप्रकल्प हे प्रश्न केवळ आंदोलनापुरते मर्यादित न राहता त्यावर ठोस व कायमस्वरूपी तोडगा निघणे गरजेचे आहे, अशी भूमिका भुमरे यांनी व्यक्त केली. मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळावे यासाठी शासन स्तरावर सातत्याने प्रयत्न सुरू ठेवण्याचे आश्वासनही त्यांनी आंदोलकांना दिले.

## प्रतिबंधित दुर्मीळ कासवाची तस्करी करणारे पाच जेरबंद

**अजिंठा प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर-सिल्लोड मार्गावरून प्रतिबंधित दुर्मीळ कासवाची तस्करी करणाऱ्या पाच जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने जेरबंद केले. पाथरी टोलनाका परिसरात सापळा रचून करण्यात आलेल्या या कारवाईत संशयितांच्या ताब्यातील ईरटीका वाहनातून पाण्याने भरलेल्या प्लास्टिकच्या बरणीत एक जिवंत कासव आढळून आले. वनविभागाच्या पडताळणीत सदर कासवाची प्रजाती प्रतिबंधित असल्याचे स्पष्ट झाले.

रविवारी (दि. १३) स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अख्तर खान शामिन खान पठाण हा आपल्या साथीदारांसह ईरटीका वाहनातून छत्रपती संभाजीनगर-सिल्लोड मार्गे जळगाव, अमळनेरच्या दिशेने जात आहे. माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक प्रकाश भा. जाधव व अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने रवाना झाले.

पथकाने कोणतीही चाहूल लागू न देता वडोदबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाथरी टोलनाका येथे सापळा रचला. वाहतुकीचा कृत्रिम अडथळा निर्माण करून संशयित वाहनाची प्रतीक्षा करण्यात येत होती. काही वेळात माहितीतील ईरटीका वाहन येताच पथकाने ते अडवून त्यातील पाच जणांना सुरक्षितपणे ताब्यात घेतले.

वाहन क्रमांक एमएच ०५ ईए ५२४८ ची झडती घेतली असता पाण्याने भरलेल्या प्लास्टिकच्या बरणीत एक जिवंत कासव आढळले. कासव बाळगण्याबाबत व त्याची वाहतूक करण्यासंदर्भात आवश्यक परवाना अथवा कागदपत्रांची विचारणा केली असता, आरोपींकडे कोणतेही वैध कागदपत्र नसल्याचे समोर आले.

# मराठवाड्याच्या रखडलेल्या विकासकामांवर शिवसेनेचा एल्गार

## जनआंदोलनाचा आज निर्णायक टप्पा; उद्धव ठाकरे धरणे आंदोलनात सहभागी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष, रखडलेले प्रकल्प आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीतील अपूर्ण घोषणांचा मुद्दा आता आंदोलनाच्या केंद्रस्थानी आला आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने पुकारलेल्या 'मराठवाड्याचा विकास... तुमसे ना हो पायेगा!' या जनआंदोलनाचा आज, १७ सप्टेंबर रोजी निर्णायक टप्पा होत आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयासमोर होणाऱ्या धरणे आंदोलनात सहभागी होणार आहेत.

शिवसेना नेते, आमदार तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या संयोजकतेखाली १ सप्टेंबरपासून मराठवाड्यातील सातही जिल्ह्यांत हे जनआंदोलन सुरू आहे. तहसील कार्यालये आणि जिल्हाधिकारी कार्यालयांवर निवेदने देण्याबरोबरच विविध ठिकाणी आंदोलने करण्यात आली. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांसमवेत जिल्ह्यातील विकासकामांबाबत चर्चा करून रखडलेल्या प्रकल्पांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे विविध सरकारांच्या काळात राज्य मंत्रिमंडळाच्या बैठका घेण्यात आल्या. सप्टेंबर २०१६ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली, तर १६ सप्टेंबर २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकींमध्ये विविध विकासकामे, प्रकल्प आणि सिंचन प्रकल्पांच्या घोषणा करण्यात आल्या. मात्र, यातील अनेक निर्णय अद्याप पूर्णत्वास गेले नसल्याचा आरोप शिवसेनेने केला आहे. या जनआंदोलनाच्या माध्यमातून शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मराठवाड्यातील २४ अपूर्ण विकासकामांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी केली. या दौऱ्यात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन करपलेल्या पिकांची पाहणी करण्यात आली. तसेच विविध भागांतील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेत शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या.

जनआंदोलनाचा निर्णायक टप्पा म्हणून आज छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर सकाळी ११.३० वाजता धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

# वनामकृवित 17 सप्टेंबरला 'रब्बी पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शन'

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी** :-मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या विस्तार शिक्षण संचालनालय, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'रब्बी पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शन' आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठातील कृषि महाविद्यालयाच्या सभागृहात येथे होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री मा. ना. ॲड. श्री. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते होणार आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला आणि बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा पालकमंत्री (परभणी जिल्हा) मा. ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, परभणी महानगरपालिकेचे महापौर मा. श्री. सय्यद इकबाल सय्यद खाजा आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती लता विजयकुमार वाकळे या विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनामकृविचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि राहणार आहेत.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून राज्यसभा सदस्य मा. खा. अशोक चव्हाण, राज्यसभा सदस्य मा. खा. डॉ. अजित गोपछडे, राज्यसभा सदस्य मा. खा.श्री रामाराव वडकुते, लोकसभा सदस्य मा. खा. श्री. संजय जाधव, विधान परिषद सदस्य मा. आ. श्री. सतीश चव्हाण, विधान परिषद सदस्य मा. आ. श्री. विक्रम काळे,

विधान परिषद सदस्य मा. आ. श्री. सईद खान शेरगुल खान, विधानसभा सदस्य मा. आ. डॉ. राहुल पाटील, विधानसभा सदस्य मा. आ. श्री रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य मा. आ. श्री. बालाजी कल्याणकर, विधानसभा सदस्य मा. आ. श्री राजेश विटेकर, विधानसभा सदस्य मा. आ. श्रीमती श्रीजया चव्हाण हे उपस्थित राहणार आहेत. विशेष उपस्थितीत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष मा. श्री. तुषार पवार, महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाचे सचिव माननीय डॉ. परिमल सिंह (भाप्रसे), महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप स्वामी (भाप्रसे), भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या नागपूर येथील राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि जमीन वापर नियोजन ब्युरोचे संचालक डॉ. एन. जी. पाटील, परभणीचे जिल्हाधिकारी माननीय श्री संजयसिंह चव्हाण (भाप्रसे), पोलीस अधीक्षक माननीय श्री पंकज कुमावत (भापोसे), जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय श्रीमती नतिशा माथुर (भाप्रसे) आदी मान्यवर आहेत.

## चक्क जन्ममृत्यु नोंदणी कार्यालयात घातला नागरिकांनी गोंधळ

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:-** गेल्या अनेक दिवसापासून मनपाच्या जन्ममृत्यु नोंदणी कार्यालयात नागरिकांना अनेक चकरा मारू नही त्यांचे काम होत नाही म्हणून संतप्त जमावाने माझे काम आत्ताच करा किती वेळ लागणार आहे असे म्हणत महापालिकेच्या जन्ममृत्यू नोंदणी कार्यालयात धिंगाणा घालत कार्यालयातील कागदपत्रे अस्तव्यस्त फेकण्यात आली ही घटना दिनांक 16 सप्टेंबर बुधवार रोजी दुपारी दोनच्या सुमारास घडली सदरील घटनेतसंबंधित व्यक्तीने कार्यालयातील कर्मचाऱ्यांशी हुजत घालत वाद घातला व त्यांना शिव्याही देण्यात आल्या मनपा कर्मचाऱ्यांना नवा मोंढा पोलीस ठाण्यात गेले असून तक्रार देण्यात आली वसमत रोडवरील बी रघुनाथ सभागृहातील महापालिकेचे जन्म मृत्यू नोंदणी कार्यालय आहे या कार्यालयामध्ये कर्मचारी काम करत असताना जणांचा घोळका कामासाठी उभा होता त्यातील एक जणांने खूप वेळा चकरा मारू नये काम होत नाही म्हणून संतप्त होत आत्ताच्या आत्ता माझे काम करून द्या कर्मचारी गौतम वडमारे,अभिजीत राठोड,यासिर उज्जत घालत वाद करण्यास सुरुवात केली व कार्यालयातील इतर कागदपत्रे अस्तव्यस्त फेकत कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली घडलेला प्रकार कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय अधिकारी डॉक्टर कल्पना सावंत यांना सांगितला कर्मचारी संबंधित व्यक्तीच्या विरोधात नवा मोंढा पोलिसठाण्यात तक्रार देण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत

# परभणीचे सांस्कृतिक वैभव युनेस्कोत पोचण्यासाठी गणेशोत्सवाचे दस्तऐवजीकरण करा : जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक असलेल्या गणेशोत्सवाला शासनाने राज्य महोत्सव म्हणून घोषित केले आहे. या उत्सवाला युनेस्कोत अमूर्त सांस्कृतिक वारसा म्हणून मान्यता मिळवून देण्यासाठी राज्य शासनामार्फत व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. या लोकसहभागाच्या उपक्रमात परभणी जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या पुरातत्त्व संचालनालयामार्फत Bappa.org हे विशेष पोर्टल विकसित करण्यात आले असून, त्याद्वारे राज्यातील गणेशोत्सवाचे डिजिटल दस्तऐवजीकरण करण्यात येत आहे. नागरिकांना आपल्या घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सवाशी संबंधित फोटो, व्हिडिओ आणि माहिती Bappa.org पोर्टलद्वारे अपलोड करता येणार आहे.

जिल्ह्यातील नागरिक, सार्वजनिक गणेश मंडळे आणि कलावंतांना नोंदणी करणे सुलभ व्हावे, यासाठी Bappa.org पोर्टल जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर parbhani.nic.in वरही उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना जिल्हा संकेतस्थळावरून आपल्या गणेशोत्सवाच्या आठवणी आणि सांस्कृतिक दस्तऐवज सहजपणे अपलोड करता येतील.



या उपक्रमांतर्गत घरगुती गणेशोत्सवातील कौटुंबिक विधी, पारंपरिक पूजा, नैवेद्य व खाद्यपरंपरा, पारंपरिक सजावट, सामाजिक संदेश देणारे देखावे, ऐतिहासिक परंपरा, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच भजन, कीर्तन, ढोल-ताशा, संगीत यांसारख्या लोककला, परंपरा आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांची माहिती अपलोड करता येणार आहे. तसेच पारंपरिक मूर्तिकार, कारागीर, शाडूच्या मूर्ती बनविणारे कलावंत आणि स्थानिक लोककलेचेही दस्तऐवजीकरण करता येणार आहे, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे.

या पोर्टलवर नोंदणी करून दस्तऐवजीकरण करणाऱ्या नागरिक, सार्वजनिक गणेश मंडळे, बचत गट आणि गृहनिर्माण संस्थांना महाराष्ट्र शासनातर्फे 'डिजिटल कल्चरल प्रिजर्व्हर सर्टिफिकेट' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. जिल्ह्याला संतपरंपरा, लोककला आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभला आहे. जिल्ह्यातील गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य, पारंपरिक कला आणि लोकसंस्कृती जगासमोर आणण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांनी या मोहिमेची व्यापक प्रसिद्धी करून अधिकाधिक परभणीकरांना सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या या जागतिक दस्तऐवजीकरण मोहिमेत सहभागी होण्यासाठी नागरिकांनी Bappa.org या अधिकृत पोर्टलचा वापर करावा. तसेच परभणी जिल्ह्याच्या अधिकृत parbhani.nic.in या संकेतस्थळावरूनही नोंदणी व दस्तऐवज अपलोड करता येणार आहेत. नागरिकांना WhatsApp किंवा Direct Upload या माध्यमातूनही आपली माहिती, फोटो व व्हिडिओ सादर करता येतील. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या नागरिकांना आणि संस्थांना महाराष्ट्र शासनाचे 'डिजिटल कल्चरल प्रिजर्व्हर सर्टिफिकेट' देण्यात येणार आहे.

# सं पा द की य

## शासकीय सेवांमध्ये सुलभता आणि पारदर्शकता

नागरिकांना शासकीय सेवा अधिक पारदर्शक, सुलभ, कालबद्ध आणि डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने अत्यंत महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सेवांमध्ये शासन प्रक्रिया पुनर्रचना (GPR) अंतर्गत अनेक कळीचे बदल करण्यात आले आहेत. या सुधारणांमुळे प्रशासकीय कामकाजातील लालफितीचा कारभार संपुष्टात येण्यास मदत होणार असून, सर्वसामान्य नागरिक आणि व्यावसायिक यांना वेळेत व विनासायास सेवा मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. प्रशासनाला अधिक गतिमान आणि उत्तरदायी बनवण्याच्या दृष्टीने घेतलेला हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. नव्या शासन निर्णयानुसार अधिसूचित सेवांची संख्या सुटसुटीत करण्यात आली असून, नागरिकांसाठीच्या जी टू सी (G2C) सेवांची संख्या सातवरून चार करण्यात आली आहे, तर व्यवसायांसाठीच्या जी टू बी (G2B) सेवा सोळा कायम ठेवण्यात आल्या आहेत. यामध्ये विशेषतः रेशन कार्ड सेवांना प्रचंड गती देण्यात आली असून नवीन रेशन कार्ड काढणे, नावाची दुरुस्ती करणे, नावाचा समावेश किंवा वगळणे यांसारख्या प्रक्रियांचे प्रशासकीय टप्पे कमी करण्यात आले आहेत. अंत्योदय व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकेसाठी १८ दिवसांत, तर पांढऱ्या रेशन कार्डसाठी २१ दिवसांत सेवा देण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. याशिवाय, अनावश्यक कागदपत्रे आणि प्रतिज्ञापत्रांची अट शिथिल करून स्वघोषणापत्राला प्राधान्य देण्यात आले आहे, तसेच अंतिम प्रमाणपत्रांवर क्युआर कोडची सुविधा दिलqयामुळे छेडछाड किंवा बनावटगिरीला आळा बसणार आहे. या सर्वसमावेशक बदलांमुळे केवळ नागरिकांचेच नव्हे, तर वैध मापनशास्त्र विभागाशी संबंधित उत्पादक, दुरुस्तीदार व विक्रेत्यांचे परवाने देखील जलद गतीने मिळणे शक्य झाले आहे. वजन-माप उत्पादक परवान्याची कालमर्यादा पस्तीस दिवसांवरून पंधरा दिवसांपर्यंत, तर विक्रेता परवान्याची मर्यादा अवघ्या सात दिवसांवर आणण्यात आली आहे. काही परवान्यांसाठी स्वयंचलित नूतनीकरणाची सुविधा मिळाल्याने व्यावसायिकांचा वेळ आणि श्रम वाचणार आहेत. डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि कागदी प्रक्रिया कमी करण्याच्या या धोरणामुळे शासनाच्या प्रत्येक विभागातील कारभार अधिक पारदर्शक, जनहिताचा आणि गतिमान होईल यात शंका नाही.

## थोर स्वातंत्र्य सेनानी कै.बाबुरावजी काळे यांचे मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील योगदान

देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारतात 565 संस्थांना पैकी 3 संस्थाने भारतात विलीन झाली नव्हती त्यात काश्मीर,जुनागड, व हैद्राबाद याचा समावेश होता. इ.स.1724.मध्ये हैद्राबाद संस्थान मीर कमरुद्दीन यांनी स्थापन केले होते.मराठवाडा प्रदेश हा हैद्राबादसंस्थानात होता. सातव्या निजामाच्या काळात मराठवाड्यातील हिंदूंवर



अन्याय अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढले होते. हैद्राबाद येथील निजामाच्या जुलमी अत्याचारी जोखडातून बाहेर पडण्यासाठी येथील जनतेने एकसंघ होऊन" मराठवाडा मुक्ती संग्राम लढा"उभारण्यात आला होता.हा लढा म्हणजे "जुलमी रझाकारी" राजवटी विरुद्ध सामान्य जनतेने केलेला हा उठाव होता. भारतीय स्वातंत्र्यानंतर हैद्राबाद संस्थान भारतात विलीन व्हावे ही येथील जनतेची मागणी होती.मात्र निजामाच्या महत्वकांक्षी धोरणामुळे हैद्राबाद संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण झाले नाही.उलट आपल्या संस्थानाला स्वतंत्र दर्जा मिळावा या उद्देशाने निजामाने "राझाकारी" संघटनेला हाताशी धरून मराठवाड्यातील जनतेवर अन्याय अत्याचार सुरू केले त्यात हिंदूची घरे लुटणे, स्त्रियावर अत्याचार करणे,जनतेच्या मालमत्ता लुटणे, या घटना दिवसेंनदिवसवाढत होत्या या अन्याय अत्याचाराविरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली कै. बाबुरावजी काळे, गोविंदभाई श्रॉफ, आ कृ वाघमारे,बाबासाहेब परांजपे, माणिकचंद पहाडे, दगडाबाई शेळके,काशिनाथ कुलकर्णी,यांनी मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील तरुणाला संघटित करण्याचे काम केले.या कामात औरंगाबाद जिल्यातील स्वातंत्र्यसैनिकाचे योगदान मोठे होते. कै.बाबुराजी काळे यांनी मराठवाड्यातील तरुणाला संघटीत करण्याचे काम केले. ग्रामीण भागात गुप्त बैठका घेउन ,निजामाविरुद्ध पत्रक वाटणे, भूमिगत राहून निजामा विरुद्ध संघर्षकरून मराठवाड्यातील जनतेला स्वाभिमानाचे धडे दिले.त्यातून तरुणाची मोठी फळी निर्माण झाली इ.स 1938 पासून वंदेमातरम चळवळ उभी करण्यासाठी त्यांनी कार्य केले. शेंदुर्णी कॅम्प जवळील सोयगाव, अजिंठा परिसरातील फर्दापूर आमखेडा, जरंडी, बनोटी, गलवाडा, पळसखेडा ,कवली, घोसला, गोंदेगाव, दस्तपूर, वनगाव, सावरखेडा, वाकडी या गावातील स्वातंत्र्य सैनिकाना एकत्र करून सामान्य जनतेला मराठवाडा मुक्तिसंग्राम आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले, यात जरांडीचे विश्वनाथ राजहंस ,रामराव व्यंकटेश, शामू पाटील झेंडू मोतीराम, फर्दापूरचे यादव बलांडे, तुकाराम वाघ, नामदेव वाघ, दगडू बलांडे, गोविंद साबळे, हिरालाल जैस्वाल, सांडू बलांडे, तुळशीराम बालांडे , सोयगाव येथील हॉंनसिंग हजारी, कान्हया बाबूशीह हजारी, लक्ष्मण पवार, पंढरीनाथ देसाई, भुजंग बाळा जाधव, विश्वनाथ सोनार,नामदेव गणपत जाधव, काशिनाथ सोनार, हरीराम तेली, नामदेव क्षीरसागर, लक्ष्मण श्रीवास्तव ,तुळशीराम सोनार, सोमनाथ झंवर,, कवलीचे हरिभाऊ गोडबोले, सावरखेडा येथील अच्युतराव काकडे, घोसला येथील नाथू लोहार, लालचंद जैन, रामजी सोनवणे, तुळशीराम रामजी,मोतीराम सोनाजी, गलवाडा येथील शिवराव देशमुख,नामदेव पाटील, नारायण देशमुख, पंढरी वाघमारे, तुकाराम पाटील, पांडुरंग कोळी, पळसखेड चे शिवशीह शेवगण ,शेउखाडू सिंह परदेशी, रामसिंग परदेशी,हरचंद परदेशी, दलशिंग परदेशी, जुगराम दलचंद, गोंदेगाव येथील कृष्णा पवार,झीपरू महापुरे, त्र्यंबक नांनकर , दामा निकम,रामदास येवले,त्र्यंबक महादु , दस्तपूर चे उमराव चंदेल, वाकडीचे श्यामराव निकम, सोयगाव तालुक्यातील जवळपास 59 स्वातंत्र्य सैनिकांना सोबत घेऊन निजाम राजवटीविरूद्ध गावा गावात गुप्त बैठका घेऊन सामान्य जनतेला एकत्र करून मराठवाड्यातील भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना अन्नधान्ये पुरविणे, स्वातंत्र्य सैनिकांना गुप्त ठिकाणी आश्रय देणे,त्यांना हत्यारे पुरवणे, गावठी हत्यारे तयार करण्यासाठी आर्थिक मदत करणे विविध,रसद पोहचविण्याचे काम करीत असताना कै.बाबुराजी काळे यांना निजामाच्या सैनिकांनी पकडले. व हर्सूल जेल मध्ये राजकीय कैदी म्हणून त्यांना आपल्या साथीदारां सोबत कारागृहात ठेवण्यात आले, कै. बाबुरावजी काळे, व लक्ष्मणीनारायण जैस्वाल, यांनी अत्यंत शिताफीने हर्सूल कारागृह फोडून तेथून बाहेर पडले व वंदेमातरम च्या घोषणा देत पुन्हा आंदोलनात सहभागी झाले. गावागावांतील सैनिकानी निजामाच्या विरुद्ध मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात बंड केले. या कार्यात कै. बाबुराजी काळे यांनी आपल्या विश्वासू सहकाऱ्यांना सोबत घेतले ,त्यात होनशिंग हजारी, गंगाराम मानकर, भिकाजी पाटील, यांनी भूमिगत राहून सैनिकांना अन्नधान्य पुरविणे, हत्यारे पुरवविले तर मराठवाडा मुक्तिसंग्राम आंदोलनातिल सैनिकांना बंदुका चालविण्याचे प्रशिक्षण देण्याचे काम गोविंदभाई श्रॉफ यांनी केले.

निजामाच्या विरुद्ध गुप्त पत्रके वाटण्याच्या कामात सोयगाव तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक आघाडीवर होते. मराठवाडा मुक्तिसंग्राम आंदोलनाची तीव्रता व्यापक झाली आंदोलन निर्णायक टप्प्यावर असताना भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभ भाई यांनी " ऑपरेशन पोलो "मोहीम राबविली त्या"नंतर 17 सप्टेंबर 1948 रोजी निजाम शरण आला ,व मराठवाडा भारतीय संघराज्यात विलीन झाला. मराठवाड्यातील खेड्यापाड्यात विजयउत्सव सुरू झाला.ठिकठिकाणी तिरंगा फडकवला गेला. मात्र मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यात सहभागी सैनिकाची फारशी नोंद झालेली नव्हती, त्यासाठी कै.बाबुरावजी काळे यांनी एक उच्चाधिकार समिती स्थापन केली, या समितीद्वारे खेड्यापाड्यातील नोंद नसलेल्या स्वातंत्र्य सैनिकांची नोंद घेऊन, त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी शासन दरबारी पाठपुरावा केला. पुढे बाबुरावजी काळे सक्रिय राजकारणात सहभागी झाले,त्यांनी सोयगाव, सिल्लोड चे आमदार,जालन्याचे खासदार म्हणून विधानसभा, विधानपरिषद, लोकसभाचे प्रतिनिधित्व केले.चार वेळा विविध खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी कार्य केले, मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील अशा या थोर स्वात्र्यसेनानी कै. बाबुरावजी काळे यांना वंदन.....

**- प्रा.डॉ.भास्कर टेकाळे,पंडित जवाहरलाल महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर मो.8624952936**

# मराठवाडा अजूनही मागासलेलाच आहे..!

महाराष्ट्रात मराठवाडा इतर विभागांच्या तुलनेत मागास राहिलेला आहे ही काही लपून राहिलेली नाही. दुष्काळ निर्मूलनाची अनास्था, पीक पद्धती विकसित झालेले नाही, शेतमजुरांचं नोकरीसाठी शहरात जाणं आणि उसतोडीसाठी सातत्याने स्थलांतर होणं ही मागासलेपणाचे लक्षण आहेत. महाराष्ट्रातील एकूण औद्योगिक प्रकल्पांपैकी फक्त १२ टक्के मराठवाड्यात, आणि तेही छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड शहराभोवती केंद्रित आहेत. सहकार क्षेत्रही यथातथाच अवस्थेत आहे. मराठवाड्यातील राजकीय नेतृत्वाने शेती, सिंचन, कृषी बाजारपेठ, प्रक्रिया उद्योगाकडे दुर्लक्ष केल्यामुळे उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा मागास राहिलेला आहे. थोडं इतिहासात जाऊन बघितलं तर तिथे असलेल्या निजामशाहीमुळे ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालील इतर विभागांच्या तुलनेत आधुनिकतेची मूल्यं, संचारसाधनं, दळणवळणाचे मार्ग, औद्योगिकीकरण आणि शिक्षण संस्था हे सगळंच मराठवाड्यात उशिरा पोहोचलं, सामाजिक सुधारणेच्या चळवळी आणि राजकीय गतिशीलतेचा इथे पूर्वी पासूनच दुष्काळ होता. त्याचबरोबर शेतीपूरक धोरणाचा आणि औद्योगिक विकासाचाही मागमूस नव्हता. निजाम राजवटीच्या पाडावानंतर मराठवाडा विभाग विनाअट संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला. मात्र निजामी राजवटीतील मागासलेपणाचे अवशेष तसेच शिल्लक राहिले. शेती सुधारणांचा अभाव, पीक पद्धतीतील नियोजनाची कमतरता, कृषी बाजारपेठांचा अविकसितपणा, जलसाठ्यांच्या निर्मितीची कमतरता, त्यांच्या नियोजनाचा आणि व्यवस्थापनाचा अभाव, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील अतिक्रमण आणि औद्योगिक विकासाला गती नसणं. त्यातही एक तर योग्य नेतृत्व मिळालं नाही जे काही मिळाले ते आपल्या स्वतःच्या वयक्तिक प्रसिद्धीसाठी फिरत राहिले. या कारणांमुळे मराठवाड्याच्या विकासाची गती मंदावली. याशिवाय मराठवाड्यातली पाणीटंचाई आणि रोजगाराअभावी होणारं मजुरांचं स्थलांतर या मोठ्या समस्या बनल्या आहेत. मराठवाड्यात औद्योगिक विकास झालेला नसल्यामुळे तिथली अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. इथली सुमारे ७० टक्के कुटुंबं आपल्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी शेती आणि शेतीसंबंधित जोडव्यवसाय, जोड-उद्योग व मजुरीवर अवलंबून आहेत. या भागात शेतमजूर, अल्पभूधारक आणि भूमिहीनांचं प्रमाणही मोठं आहे. असं असूनही शेती, शेतीवर आधारित इतर जोड-उद्योग, शेतीपूरक व्यवसाय, शेतीमाल प्रक्रिया उद्योग इत्यादींच्या विकासाकडे शासनाने लक्ष दिलेलं नाही. मराठवाड्यात दुग्धव्यवसाय विकासाचा पूर्णपणे अभाव आहे. आता आता कुठ काही लक्ष घालून हा व्यवसाय विकसित होत आहे. पण म्हणावं तसा नाही. संभाजी नगरची वाढ कमालीची घटली आहे, नांदेडची गती मंदावली आहे. दुसरं म्हणजे जिल्हा आणि तालुक्याच्या कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यक्षम बनवण्यामध्येही शासन अपयशी ठरलेलं आहे. एकूणच मराठवाड्याची अर्थव्यवस्था कृषी क्षेत्रावर अवलंबून असतानाही या क्षेत्राला सातत्याने दुय्यम स्थान देण्यात आलं आहे. त्यामुळे आपला कृषीमाल कुठं विकायचा या विवंचनेत जिल्ह्यातील शेतकरी असतात. काही जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बाबतीतही सरकारची अनास्था आहे.

एकेकाळी मराठवाडा विभाग ज्वारी उत्पादनात अग्रेसर होता. मूग, उडीद, सोयाबीन, धणे इत्यादी पिकं खरीप हंगामात आणि ज्वारीचं पीक रब्बी हंगामात घेणं शक्य होतं. काळ्या जमिनीत या पिकाला सिंचनाचीही गरज नसे आणि दोन-तीनदा पाण्याची पाळी मिळाली, तरी शेतकऱ्यांच्या पदरात पीक पडायचं. शेतकऱ्यांना समृद्ध करणारं आणि उत्पन्नाची शाश्वती देणारं पीक म्हणून ज्वारीकडे पाहिलं जात होतं. आज हळद उत्पादन मराठवाड्यात खुप वाढलं आहे, त्यात हिंगोली बराच पुढं आहे पण अस्मानी संकट पाठ सोडत नाही आणि सरकार भिक घालत नाही अशी स्थिती आहे. गोदावरी नदीच्या काठावरचा परिसर तर ज्वारीसाठी प्रसिद्धच होता. ४०-५० वर्षांपूर्वी कोरडवाहू भागांतून मजुरांची कुटुंबं ज्वारीच्या काढणीच्या काळात या परिसरात स्थलांतरित होत असत. अडीच-तीन महिने ज्वारीची काढणी-मळणी करून मजुरीच्या बदल्यात बैलगाडीत धान्य भरून जात. पण अलीकडे राजकीय नेतृत्वाने ज्वारी या पिकाकडे आणि त्याच्या प्रक्रिया उद्योगाकडे दुर्लक्ष केलं आणि साखर कारखानदारीमुळे उसाचं क्षेत्र वाढवलं. परिणामी, ज्वारीच्या लागवडीचं क्षेत्र कमी झालं. त्यातून इथे तयार झालेली पिकपद्धतीची साखळी तुटली आणि अर्थव्यवहारही मोडला. अशीच कथा कापूस आणि सोयाबीन या पिकांचीही आहे. आणि आता तर ऊस उत्पादन कमी झालं आहे, अनेक कारखाने मोडीत निघाले आहेत. एकीकडे मराठवाड्यातील जवळपास सर्वच नेते खासगी आणि सार्वजनिक सभांमध्ये आपला वारसा आणि व्यवसाय शेती असल्याचं सांगतात. पण शेतकऱ्यांच्या हिताची कामं करण्याचा किंवा शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करताना मात्र दिसत नाहीत. त्यामुळे शेती विकासासाठी आणि शेतमालाला हमीभाव किंवा चांगला भाव मिळवून देण्यासाठी ठोस असे प्रयत्न झालेले नाहीत. नाथसागर, इसापूर, येलदरी, माजलगाव, विष्णूपुरी, धनेगाव या जल प्रकल्पांच्या उभारणीबरोबरच त्यांच्या लाभक्षेत्रांमध्ये ऊसशेतीला प्रोत्साहन दिलं गेलं. परंतु पीक पद्धती, पाणी व्यवस्थापन, नियोजन आणि काटकसर या घटकांवर भर दिला गेला नाही. परिणामी, या प्रकल्पांचा सिंचन विकासासाठी आणि शेती विकासासाठी फारसा उपयोग झालेला दिसत नाही. अनेक मध्यम आणि मोठ्या प्रकल्पांचा उद्देश शेती सिंचन असतानाही त्यातलं पाणी उद्योगांना वळवण्यात येतं. प्राधान्यक्रमात शेतीला तिसऱ्या स्थानी टाकून उद्योगाला प्राधान्य दिलं जातं. एकाही मोठ्या जल प्रकल्पातल्या पाण्याचं नियोजन आणि व्यवस्थापन योग्य रीतीने केलं गेलं नाही. परिणामी नाथसागर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतीची अवस्था खराब झाली आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राचं अनुकरण करत मराठवाड्यात काही ठिकाणी साखर कारखाने उभारले गेले. पण दुष्काळी स्थितीत असे अनेक साखर कारखाने बंद ठेवावे लागतात. आज मराठवाड्यातील एकही साखर कारखाना सुरळीत आणि नफ्यात चालत नाही. बहुतांश कारखाने कर्जबाजारी झालेले आहेत. याशिवाय ग्रामीण जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि सोसायट्या यांची स्थितीही बिकट आहे. अपवाद वगळता सर्वच सहकारी संस्था तोट्यात किंवा बुडीत निघण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात शेती आणि जोडव्यवसायासाठी आवश्यक कर्जपुरवठ्याची चांगली व्यवस्था नाही. दुसरीकडे मराठवाड्यात जवळजवळ ८२ टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे आणि केवळ पावसाळी हंगामातच फक्त एक पीक घेता येतं. पण तरीही कोरडवाहू शेती विकासाचा प्रयत्न एकाही राजकीय नेतृत्वाने केलेला नाही. परिणामी, मराठवाड्यातील शेती क्षेत्र मागासलेलं राहिलं आहे. मराठवाड्यात शेती क्षेत्रात निर्माण झालेली आव्हानं आणि रोजगाराच्या अपुऱ्या संधी यांमुळे शेतमजूर आणि सुशिक्षित बेरोजगारांचे लोंढे पुणे, मुंबई आणि छत्रपति संभाजी नगर सारख्या मोठ्या शहरांकडे स्थलांतरित होताना दिसतात. इथे हे तरुण नोकरी, मजुरी, रोजंदारी, बिगारी काम, मदतनीस, छोटे-छोटे व्यवसाय अशा असंघटित क्षेत्रांत काम करतात. मराठवाड्यातून सर्वाधिक मजूर ऊसतोडणीसाठी हंगामी स्वरूपा चं स्थलांतर करतात. या मजुरांच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर आणि गुंतागुंतीच्या होत चालल्या आहेत. ऊसतोड मजुरांच्या केवळ भाववाढीच्या मागणीलाच थोडासा प्रतिसाद दिला जातो, पण विमा, सुरक्षा, शिक्षण आणि इतर कल्याणकारी मागण्यांकडे राजकीय नेतृत्वाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेलं आहे. त्यामुळे या मजुरांच्या तीन-तीन पिढ्या ऊसतोडणीच्या कामातच अडकलेल्या दिसतात. मराठवाड्याच्या विकासाचे प्रश्न सोडवण्यासाठी 'मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ' स्थापन झालं. परंतु आर्थिक तरतुदीअभावी हे महामंडळ प्रभावीपणे काम करू शकलं नाही. केवळ बैठका, मागासलेपणाचा आढावा आणि प्रशासकीय कामकाज यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष कार्यवाही या महामंडळाला करता आली नाही. त्यामुळे हे महामंडळ आता फक्त एक तर 'स्वप्नाळू संस्था' बनून राहिलं आहे. किंवा नेत्यांच्या राजकीय पुनर्वसन साठी झालेली आहे. मराठवाड्यातून विविध पक्षांचे ४८ आमदार असूनही ते पक्षभेद विसरून विधिमंडळात मराठवाड्याचा दुष्काळ, सिंचनाचा अनुशेष, औद्योगिक विकास, उच्च शिक्षणाच्या कॉलेजांची कमी संख्या, स्थलांतरितांचे प्रश्न, रोजगार निर्मिती आणि शेतमाल प्रक्रिया उद्योगांची उभारणी यांसारख्या प्रश्नांवर कधीही एकजूट होऊन दबावगट तयार करताना दिसत नाहीत. तेही सोडा, मतदारसंघातील दुष्काळी कामं, शेतीचे प्रश्न आणि पाणीसाठ्यांची निर्मिती यावरही ते एकत्र येत नाहीत. संपूर्ण मराठवाड्याचं विकासाच्या प्रश्नांवर नेतृत्व करू शकेल असं एकही सामाजिक किंवा राजकीय नेतृत्व आज अस्तित्वात नाही. प्रत्येक नेता स्वतःच्या जिल्ह्यापुरता किंवा मतदारसंघापुरता मर्यादित राहतो. मराठवाड्याच्या विकासासाठी सर्वसमावेशक भूमिका घेणाऱ्या नेतृत्वाची एक मोठी पोकळी मराठवाड्यात आहे. मराठवाड्याच्या मागासलेपणाला आणखी एक गोष्ट प्रामुख्याने जबाबदार आहे. ती म्हणजे राजकीय इच्छाशक्तीची कमतरता. गेल्या अनेक दशकांपासून तिथल्या राजकीय नेतृत्वाने विकासाच्या राजकारणाऐवजी जातीय आणि अस्मितेच्या राजकारणाला अधिक महत्व दिलेलं आहे. एक ना अनेक जातीय अस्मितेचे मुद्दे पुढे करून विकासाच्या प्रश्नांना बगल देण्यात येत असल्यानेही विकासाच्या बाबतीत आनंदीआनंद राहिलेला आहे. परिणामी मराठवाड्याचे प्रश्न ना ऐरणीवर येत, ना सुटत. वर्षामागून वर्ष मराठवाड्याच्या मागासलेपणाचं रडगाणं त्यामुळे चालूच आहे. तरुण अभ्यासू नेतृत्वाचे ह्याकडे आता लक्ष्य देऊन मराठवाडा ह्या भुमिसाठी काहीतरी केलं पाहिजे अन्यथा अजून कित्तेक वर्ष ह्या प्रदेशाची हीच अवस्था असेल ह्यात शंका नाही...

विशाल वसंतराव मुळे आजेगावकर.

# कधी आणि कसा होणार दुष्काळमुक्त मराठवाडा?

## मुक्तीचा अमृतकाळ संपला; विकासाचा अनुशेष मात्र कायम!

मुख्यमंत्री मराठवाड्यात आले की सातत्याने सांगतात की, "मराठवाड्यातील पुढची पिढी दुष्काळ पाहणार नाही." हे आश्वासन निश्चितच आशादायी आहे. मात्र, आजची वस्तुस्थिती पाहता हा संकल्प प्रत्यक्षात कधी आणि कसा साकार होणार, हा प्रश्न मराठवाड्यातील जनतेसमोर उभा आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि त्यानंतर १३ महिन्यांनी, १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त झाला. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या प्रक्रियेत मराठवाडा महाराष्ट्रात सहभागी झाला. सर्वांगीण विकासाचे स्वप्न उराशी बाळगून महाराष्ट्रात सहभागी झालेल्या या प्रदेशाचा विकासाचा अनुशेष मात्र आजही कायम आहे. शिक्षण, उद्योग, रोजगार, शेती आणि सिंचन अशा अनेक क्षेत्रांत मराठवाड्याला अपेक्षित न्याय मिळालेला नाही. यातील सर्वात गंभीर आणि अग्रक्रमाचा प्रश्न म्हणजे सिंचनाचा अनुशेष.

सततचा दुष्काळ : मराठवाड्याचे न भरून निघणारे नुकसान

दर दोन-तीन वर्षांनी ओला किंवा कोरडा दुष्काळ, ही परिस्थिती मराठवाड्याच्या वाट्याला सातत्याने येत आहे. दुष्काळामुळे शेती, पशुधन, फळबागा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे प्रचंड नुकसान होते. सिंचनाअभावी शेती करणे दिवसेंदिवस कठीण आणि खर्चिक होत आहे. परिणामी गरीबी, बेरोजगारी, स्थलांतर आणि शेतकरी आत्महत्या अशा दुष्टचक्रात ग्रामीण समाज अडकला आहे. अनेक गावांना आजही टँकरवर अवलंबून राहावे लागते. "टँकरवाडा" अशी ओळख निर्माण होणे ही मराठवाड्यासाठी अत्यंत वेदनादायक बाब आहे. पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटल्याशिवाय मराठवाड्याचा शाश्वत विकास शक्य नाही.

पाणी उपलब्धतेतील प्रादेशिक असमतोल : महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय पाणी उपलब्धतेचा विचार केला, तर क्षेत्रफळाच्या तुलनेत मराठवाड्याला मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. मराठवाड्याचे क्षेत्रफळ महाराष्ट्राच्या सुमारे २७ टक्के असताना पाण्याचा वाटा केवळ सुमारे ८ टक्के असल्याचे विविध अभ्यासांतून अधोरेखित झाले आहे. पश्चिम महाराष्ट्राचे क्षेत्रफळ सुमारे ४६ टक्के असताना पाण्याचा वाटा ७४ टक्के, तर विदर्भाचे क्षेत्रफळ सुमारे २७ टक्के असताना पाण्याचा वाटा १८ टक्के आहे. साधारणपणे प्रति हेक्टर ३,००० घनमीटर पाण्याची उपलब्धता आवश्यक असताना मराठवाड्यात ती सुमारे १,६८८ घनमीटर प्रति हेक्टर इतकी आहे. त्याचप्रमाणे प्रति व्यक्ती सुमारे १,७०० घनमीटर पाणी अपेक्षित असताना मराठवाड्यात ही उपलब्धता केवळ सुमारे ४३८ घनमीटर आहे.

मराठवाड्याचे सध्याचे सिंचन क्षेत्र केवळ सुमारे २० टक्क्यांच्या आसपास आहे. बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे. सुमारे ७० टक्के भूभाग दुष्काळप्रवण असून, रंगनाथन समितीच्या संदर्भानुसार ७६ पैकी ५३ तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. मराठवाड्यातील सुमारे ८० टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत. एकूणच मराठवाडा हा पाण्याची तूट असलेला, दुष्काळग्रस्त आणि विकासाच्या अनुशेषाने ग्रस्त प्रदेश आहे.

आजतागायत झालेला जलसंपत्तीचा विकास

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर विविध आयोग, समित्या आणि शासनाच्या जलविषयक धोरणांतून मराठवाड्यात जलसाठे निर्माण करण्यात आले. आज मराठवाड्यात मोठे 11, मध्यम 75 आणि लघु 791 अशा मिळून 877 शेकडो जलप्रकल्प उभे आहेत. गोदावरी, मांजरा-रेणा आदी नदीखोऱ्यांतील प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात पाणीसाठा निर्माण झाला आहे. यासोबतच मराठवाड्यातील पाणलोटासाठी उपलब्ध असलेल्या सुमारे ५० लाख हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे २९ लाख हेक्टर क्षेत्रावर एकात्मिक पाणलोट आणि जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. तरीही या सर्व प्रयत्नांचा अपेक्षित परिणाम सिंचन क्षेत्र वाढविण्यात आणि दुष्काळ कायमस्वरूपी दूर करण्यात झालेला दिसत नाही.

समन्यायी पाणीवाटपाचा प्रश्न

२०१९ च्या राज्य एकात्मिक जल आराखड्यानुसार विभागनिहाय असमतोल दूर करून उपलब्ध पाण्याचे समन्यायी तत्त्वावर वाटप होणे आवश्यक आहे. जायकवाडीच्या उर्ध्वभागासाठी ११५ टीएमसी पाणी साठवण्यास परवानगी असताना त्यापेक्षा अतिरिक्त साठवण क्षमता निर्माण झाल्याचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला जात आहे. याचा थेट परिणाम जायकवाडी धरणाच्या पाणीसाठ्यावर होतो. समन्यायी तत्त्वानुसार दरवर्षी ऑक्टोबरअखेर जायकवाडी धरणात ६५ टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा असल्यास संबंधित कायदे, मेंढेगिरी समितीचा अहवाल आणि न्यायालयीन आदेशानुसार उर्ध्वभागातून जायकवाडीत पाणी सोडणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात यासाठी वेळोवेळी संघर्ष करावा लागतो. मुकणे, वाकी, भावली आदी धरणांतील पाणी इतर भागांसाठी आणि औद्योगिक वापरासाठी आरक्षित करण्याचे निर्णय तसेच नांदूर-मधमेश्वरच्या पाण्याच्या वापराबाबतचे प्रश्न मराठवाड्याच्या दृष्टीने गंभीर आहेत. पाण्याच्या न्याय्य वाटपाशिवाय प्रादेशिक समतोल साध्य होणार नाही.

सिंचन अनुशेष : सर्वात मोठे आव्हान : महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २०२०-२१ च्या अहवालानुसार मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष सुमारे ६.१७ लाख हेक्टर आहे. हा अनुशेष भरून काढण्यासाठी मोठ्या आर्थिक गुंतवणुकीची आवश्यकता आहे. आज मराठवाड्याचे सिंचन क्षेत्र सुमारे २० टक्के, विदर्भाचे सुमारे ३० टक्के, तर पश्चिम महाराष्ट्राचे सुमारे ४० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. चितळे आयोगाच्या अहवालानुसार मराठवाड्याला 260 टीएमसी अतिरिक्त पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सिंचन अनुशेष भरून काढणे ही केवळ विकासाची बाब नसून मराठवाड्याच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

वितरण व्यवस्था आणि धरणातील गाळ : जटिल समस्या

मराठवाड्यातील कालवे, वितरिका आणि चाऱ्यांची अवस्था अनेक ठिकाणी दयनीय आहे. धरणात पाणी असूनही योग्य वितरण व्यवस्था नसल्याने ते शेताच्या बांधापर्यंत पोहोचत नाही. परिणामी "दैव देते, पण फाटकी माझी झोळी" अशी मराठवाड्यातील वितरण व्यवस्थेची अवस्था झाली आहे. धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने साठवण क्षमता कमी होत आहे. त्याचबरोबर प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव, कालव्यांची दुरवस्था, पाणी वापर संस्थांचे अपुरे बळकटीकरण आणि पाण्याच्या व्यवस्थापनातील त्रुटी यामुळे उपलब्ध पाण्याचा अपेक्षित परिणामकारक वापर होत नाही.

म्हणून केवळ नवीन धरणे बांधणे हा उपाय नसून उपलब्ध पाण्याचे कार्यक्षम व्यवस्थापन, आधुनिक वितरण व्यवस्था, कालव्यांचे सक्षमीकरण आणि पाणी वापर संस्थांचा सहभाग यावरही तितकाच भर देणे आवश्यक आहे.

राजकीय इच्छाशक्तीची गरज : मराठवाड्यात सातत्याने गंभीर होत चाललेल्या पाणी प्रश्नाला राजकीय उदासीनताही काही अंशी कारणीभूत आहे. पश्चिमवाहिनी नद्यांचे मराठवाड्याच्या हक्काचे पाणी, समन्यायी पाणीवाटप, वर्षानुवर्षे रखडलेले प्रकल्प आणि वितरण व्यवस्थेतील त्रुटी हे प्रश्न राज्याच्या पातळीवर सातत्याने आणि एकमुखाने मांडणारी राजकीय ताकद अपेक्षेइतकी प्रभावीपणे पुढे आलेली दिसत नाही. पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन संपूर्ण मराठवाड्याच्या पाणी प्रश्नाला न्याय देणारे आणि दीर्घकालीन विकासाची दृष्टी असणारे राजकीय नेतृत्व आज मराठवाड्याला गरजेचे आहे.

उपाययोजना : दुष्काळमुक्तीसाठी कालबद्ध कृती आराखडा

मुळात मराठवाडा हा पाण्याची तूट असलेला प्रदेश आहे. ज्या नदीखोऱ्यांमध्ये अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे, ते पाणी समन्यायी तत्त्वानुसार दुष्काळी मराठवाड्याकडे वळवणे ही काळाची गरज आहे.

- पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी*

महाराष्ट्र राज्य एकात्मिक जलआराखडा शासन निर्णय 23 ऑगस्ट 2019 व 19 सप्टेंबर 2023 नुसार पश्चिम वाहिनी नद्यांचे 168.75 टीएमसी पाणी नदी जोड प्रकल्पद्वारे मराठवाड्याकडे वळवणे अपेक्षित आहे. हा प्रकल्प लालफितीत अडकल्यामुळे आजतागायत एक थेंबही पाणी मिळू शकले नाही.

कृष्णा मराठवाडा प्रकल्प : कृष्णा मराठवाडा प्रकल्पांतर्गत मा .विलासरावजी देशमुख मुख्यमंत्री असताना 2005 साली 23 टीएमसी पाणी मराठवाड्याला मंजूर झाले होते. व कोल्हापूर सांगली चे पुराचे अतिरिक्त 30 टीएमसी पाणी मराठवाड्याला उजनीद्वारे मराठवाड्याला मिळावे हा 2024 चा निर्णय दोन्ही कागदावरचा असून, फक्त सात टीएमसी करिता प्रत्यक्षात काम चालू आहे .

विदर्भातील अतिरिक्त पाणी : विदर्भात नैसर्गिक नियमानुसार 71 टीएमसी पाणी अतिरिक्त आहे .यातील 32 टीएमसी पाणी येलदरी व पैनगंगा धरणात वळवून हे पाणी दुष्काळी मराठवाड्यातील हिंगोली व नांदेड जिल्ह्यांना याचा फायदा होणार आहे .

मिशन मोडवर एकात्मिक पाणलोट विकास : ज्या क्षेत्राला मोठ्या धरणांच्या लाभक्षेत्राचा फायदा होणार नाही, अशा वर्षानुवर्षे सिंचनापासून वंचित भागासाठी संरक्षित सिंचन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी मराठवाड्यात मिशन मोडवर मोठ्या प्रमाणात एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्याची गरज आहे.

- आधुनिक वितरण व्यवस्था आणि विकेंद्रीकृत जलव्यवस्थापन

अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे, कालवे व वितरिका दुरुस्त करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, पाणी वापर संस्थांना सक्षम करणे आणि पाणलोटाच्या माध्यमातून विकेंद्रीकृत जलव्यवस्थापन उभे करणे आवश्यक आहे.

यासोबतच उपलब्ध पाण्यानुसार पीकपद्धती, ठिबक व तुषार सिंचन, पाण्याचा कार्यक्षम वापर आणि भूजल पुनर्भरण यांना प्राधान्य दिले पाहिजे.

लोकचळवळीशिवाय हा प्रश्न सुटणार नाही

यापुढे मराठवाड्यातील जनतेची दुष्काळ सहन करण्याची क्षमता संपत चालली आहे. पाण्याअभावी शेती परवडत नाही, रोजगाराच्या संधी कमी आहेत आणि मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे. या परिस्थितीचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम व्यापक आहे. मराठवाड्याच्या न्याय्य हक्काच्या पाण्यासाठी समाजातील सर्व स्तरांतील जनतेच्या सहभागातून सजग, प्रगल्भ, सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि लोकाभिमुख जलजनचळवळ उभी करण्याची गरज आहे.मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेऊन मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी सर्वसमावेशक आणि कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा. अंतरखोरे पाणीवहन, समन्यायी पाणीवाटप, अपूर्ण प्रकल्पांची पूर्तता, आधुनिक वितरण व्यवस्था, पाणलोटाच्या माध्यमातून विकेंद्रीकृत जलव्यवस्थापन, उपलब्ध पाण्यानुसार पीकपद्धती आणि पाण्याचा कार्यक्षम वापर या सर्व बाबींचा समन्वय साधून कार्यक्रम राबविला, तर दुष्काळमुक्त मराठवाडा हे स्वप्न नक्कीच साकार होऊ शकते.

आज गरज आहे ती केवळ आश्वासनांची नाही, तर ठोस निर्णयांची, प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची आणि कालबद्ध अंमलबजावणीची.

दुष्काळमुक्त मराठवाडा ही घोषणा नव्हे, तर मराठवाड्याचा हक्क आहे!

**- नरहरी शिवपुरे**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या प्रवेशासाठी 30 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:-** इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृह प्रवेशासोबतच वसतिगृह योजनेपासून वंचित विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करण्यासाठी बुधवार, दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, असे सहायक संचालक रामेश्वर मुंडे यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

परभणी जिल्ह्यातील तालुक्यांच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयांमध्ये व्यवसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी **https**://www.hmasnew.mahait.org/ संकेतस्थळावर ऑनलाइन प्रवेश अर्ज दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सादर करावेत.

तसेच, आधार व स्वयंम् योजनेंतर्गत नूतनीकरणाचे अर्ज भरण्याबाबत स्वतंत्रपणे सूचना देण्यात येणार आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत केवळ सन २०२६-२७ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनीच ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक रामेश्वर मुंडे यांनी केले आहे.

# रुग्णालयात आहात; मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय मदत कक्षाशी संपर्क करा : डॉ. बालाजी ईप्पर

## ओमसाई मित्र मंडळ येथे 'गणेशोत्सव लोकसंवाद-२०२६' उपक्रमाचा श्रीगणेशा

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या गरजू रुग्णांना विविध गंभीर आजार, शस्त्रक्रिया व उपचारांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय मदत कक्षाकडून तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी थेट मदत मिळते, त्यासाठी रुग्णालयातील डॉक्टरांशी किंवा मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय मदत कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन वैद्यकीय अधिकारी तथा कक्षाचे अध्यक्ष डॉ. बालाजी ईप्पर यांनी आज येथे केले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने 'श्री गणेशोत्सव लोकसंवाद-2026'राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा जागर या कार्यक्रमाचे आयोजन नवा मोंढा येथील ओमसाई मित्रमंडळाच्या 'परभणीचा महाराजा' येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष ओम रिठे, उपाध्यक्ष साईओम चव्हाण, सचिव अभिषेक घटमाळ, सहसचिव अंकुश हिवरे आणि कोषाध्यक्ष चिंतामणी साडेगावकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय मदत कक्षाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या गरजू रुग्णांना उपलब्ध होणाऱ्या आर्थिक सहाय्याची माहिती त्यांनी दिली. पात्र रुग्णांनी संबंधित योजनेच्या निकषांची पूर्तता करून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन त्यांनी केले.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम व सेवांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने जिल्हा माहिती कार्यालय, परभणीच्या वतीने आयोजित 'गणेशोत्सव लोकसंवाद-२०२६' उपक्रमाचा श्रीगणेशा ओमसाई मित्र मंडळ येथे करण्यात आला. या उपक्रमांतर्गत नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासोबतच पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येत आहे.

गणेशोत्सव हा लोकसहभाग आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव असून, या उत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या लोककल्याणकारी योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. गणेश मंडळांच्या माध्यमातून योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीअंतर्गत कॉकलियर इम्प्लांट (अंतःकर्ण रोपण) शस्त्रक्रिया, हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस, अस्थिमज्जा व हाताचे प्रत्यारोपण, खुब्याचे व गुडघ्याचे प्रत्यारोपण, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, औषधोपचार व किरणोपचार, रस्ते अपघातातील शस्त्रक्रिया व उपचार, नवजात शिशू व लहान बालकांशी संबंधित आजार व शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायलिसिस, जळीत रुग्णांवरील उपचार तसेच विद्युत अपघात व विद्युत जळीत रुग्णांवरील उपचारांसाठी पात्रतेनुसार अर्थसहाय्य मिळू शकते, असे डॉ. ईप्पर यांनी सांगितले.

कॉकलियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी 2 ते 6 वर्षे वयोगटातील बालकांना योजनेचा लाभ मिळू शकतो. संबंधित योजनेच्या निकषांनुसार पात्रता निश्चित केली जाते. त्यासाठी रुग्णालयातूनच ऑनलाइन अर्जाची सुविधा उपलब्ध आहे. त्यासाठी अर्जासोबत रुग्णाचे आधार कार्ड, शिधापत्रिका आणि 1 लक्ष 60 हजार रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे. तसेच इतर उपचार घेताना रुग्ण व अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो, रुग्णालयाकडील उपचाराच्या खर्चाचे अंदाजपत्रक, अपघाताच्या उपचारासाठी एफआयआरची प्रत किंवा पोलीस डायरी, अवयव प्रत्यारोपणाच्या प्रकरणात मॅचिंग रिपोर्ट, रुग्ण किंवा नातेवाईकांचे संमतीपत्र आणि डिस्चार्जपूर्वी अर्ज करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा लाभ घेण्यासाठी रुग्णालयात दाखल झाल्यानंतरच आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यानंतर अर्ज सादर केलेल्या रुग्णाला या निधीतून आर्थिक मदत दिली जात नाही.

यावेळी धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांसाठी उपलब्ध असलेल्या वैद्यकीय उपचार व विविध सवलतींची माहितीही देण्यात आली. आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांनी उपलब्ध शासकीय व धर्मादाय सुविधांचा लाभ घ्यावा, तसेच या सुविधांची माहिती गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन डॉ. ईप्पर यांनी केले.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षांतर्गत परभणी शहरातील आशीर्वाद हॉस्पिटल, अनन्या हॉस्पिटल, अंकुर बाल रुग्णालय, देवगिरी हॉस्पिटल, जी-१ हॉस्पिटल, कौशल्या किडनी केअर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मोरया हॉस्पिटल, पांडुरंग हॉस्पिटल, परभणी आयसीयू, परतानी हॉस्पिटल, पार्वती अंभोरे हॉस्पिटल, प्रसाद हॉस्पिटल, राधा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स (रिम्स) हॉस्पिटल, आरपी हॉस्पिटल, सह्याद्री हॉस्पिटल, सिद्धिविनायक बाल रुग्णालय, स्पंदन आयसीयू, स्वाती क्रिटी केअर, विघ्नहर्ता हॉस्पिटल, जाधव सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, अबोली हॉस्पिटल आणि मानवत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, मानवत, अशा एकूण 22 रुग्णालयांचा समावेश आहे.

# श्री.अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्था सोयगावच्या अध्यक्ष पदी पंकज रगडे बिनविरोध



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१६ सप्टेंबर - श्री.अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्था सोयगावच्या अध्यक्ष पदाची निवड अध्याशी अधिकारी विलास घुगे,सहकार अधिकारी सोयगाव श्रेणी-१ यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली.यावेळी पंकज रगडे यांची अध्यक्ष पदी बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष विठ्ठल राठोड यांनी नवनियुक्त चेअरमन पंकज रगडे यांचे स्वागत केले तसेच अध्याशी अधिकारी विलास घुगे यांनी नवनियुक्त चेअरमन यांचा सत्कार केला.यावेळी शिक्षक सहकार पॅनलचे पॅनल प्रमुख दिवाकर चोपडे,भास्कर चौधरी,अनिल निकम,राजेश जंजाळ,गोपाल चौधरी,हरिदास काटोले यांची प्रमुख उपस्थिती होती.त्याचप्रमाणे सोयगाव तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष कृष्णा पाटील,माजी चेअरमन शकूर शेख,व्हाईस चेअरमन दुर्गादास बलांडे,मानद सचिव संदीप चौधरी,सहकार पॅनलचे संचालक संतोष वाघ,संदिप सोनवणे,रघुनाथ काटोले तसेच संस्थेचे कर्मचारी प्रमोद जाधव,रमेश वामने हे उपस्थित होते.भास्कर चौधरी व दिवाकर चोपडे पतसंस्थेचे माजी संचालक,चेअरमन यांनी तसेच तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अक्षय धंदर,लिपिक भिकन पाटील,चेअरमन यांनी अध्यक्ष निवडीबद्दलअभिनंदन करून सभासद व पतसंस्था हितासाठी काम करण्यास शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी जेष्ठ शिक्षक भिमराव सुरवाडे,प्रशांत पाटील उपस्थित होते.

# 'टीबी मुक्त भारत अभियान' अंतर्गत परभणी जिल्ह्यात एनसीसी कॅडेट्सची पथके तैनात होणार

## क्षयरोग निर्मूलन व जील्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी एनसीसी व युवा स्वयंसेवकांची संयुक्त मोहीम

हिंदु प्रकाश वार्ता //प्रतिनिधी

**परभणी, दि. १६ सप्टेंबर २०२६ :** केंद्र व राज्य शासनाच्या 'टीबी मुक्त भारत अभियान' अंतर्गत परभणी जिल्ह्यात क्षयरोग निर्मूलनाची मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा भाग म्हणून जिल्ह्यातील प्रत्येक तालुका तसेच नागरी प्रभागांमध्ये विशेष पथकांची स्थापना करण्यात येणार आहे.

आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक श्री. संजय श्रीपतराव काटकर यांनी या अभियानात एनसीसी कॅडेट्सचा सहभाग महत्त्वपूर्ण खाणार असल्याचे सांगितले आहे .

या अभियानांतर्गत प्रत्येक ब्लॉक व नागरी प्रभागातील पथकाचे नेतृत्व वर्ग-१ अधिकारी करणार असून, पथकात ५ एनसीसी कॅडेट्स आणि ५ 'माय भारत' स्वयंसेवकांचा समावेश असेल. ही पथके ग्रामीण तसेच शहरी भागात घरोघरी भेटी देऊन क्षयरोगाबाबत जनजागृती, समुदाय संपर्क, संशयित व्यक्तींचा आरोग्य सेवांशी संपर्क आणि क्षेत्रीय पातळीवरील निरीक्षण व संदर्भाचे कार्य करणार आहेत.

एनसीसी कॅडेट्सना अभियानाची उद्दिष्टे, क्षयरोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, तपासणीचे महत्त्व तसेच नागरिकांना उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवांबाबत जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या समन्वयाने विशेष अभिमुखीकरण व प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

समाजातील युवकशक्तीचा प्रभावी सहभाग घेऊन क्षयरोग निर्मूलनाच्या जनजागृतीला व्यापक स्वरूप देण्याचा आरोग्य विभागाचा प्रयत्न आहे.

"क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास तातडीने तपासणी करून घ्या, उपचार पूर्ण करा आणि क्षयरोगमुक्त परभणीच्या संकल्पात सहभागी व्हा," असे आवाहन करण्यात आले आहे.

परभणी जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी आरोग्य विभाग, एनसीसी कॅडेट्स आणि 'माय भारत' स्वयंसेवक यांच्या समन्वयातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती डॉ. प्रसाद केंद्रेकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी यांनी दिले.

# भिवंडीतील उमर अपार्टमेंटच्या पार्किंगला भीषण आग ; 14 दुचाकी जळून खाक

**भिवंडी :** बुधवारी पहाटे भिवंडीच्या खंडुपडा परिसरातील उमर अपार्टमेंटच्या तळघरातील पार्किंगमध्ये एका भीषण आगीची दुर्दैवी घटना घडली. या आगीत तब्बल १४ दुचाकी जळून खाक झाल्या असून, इमारतीमध्ये धूर पसरल्याने रहिवाशांमध्ये एकच तारांबळ उडाली आणि सुरक्षेसाठी त्यांना इमारतीच्या गच्चीवर धाव घ्यावी लागली.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, ही आग पहाटे पावणेचार ते चारच्या दरम्यान लागली. आगीच्या तीव्र ज्वाळांनी संपूर्ण पार्किंग परिसर वेढला होता. आग नियंत्रणात आल्यानंतर पाहणी केली असता, १४ दुचाकी पूर्णपणे जळून खाक झाल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी शांतीनगर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला असून, शॉर्ट सर्किट हे आगीचे प्राथमिक आणि संभाव्य कारण असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

उमर अपार्टमेंटमध्ये एकूण २५ च्या आसपास फ्लॅट्स आहेत. पहाटेच्या सुमारास अचानक इमारतीत धूर भरू लागल्याने नागरिकांची झोपमोड झाली.

# शिवना येथे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात संपन्न




**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व क्रीडा कौशल्याला चालना देण्यासाठी तालुकास्तरीय बुद्धिबळ (चेस) स्पर्धेचे आयोजन मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल, शिवना येथे करण्यात आले. या स्पर्धेत सिल्लोड तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. बुद्धिबळ हा विद्यार्थ्यांच्या एकाग्रता, तर्कशक्ती, निर्णयक्षमता व नियोजन कौशल्याला विकसित करणारा खेळ असल्याने स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. विविध शाळांमधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत स्पर्धेत रंगत आणली. स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या वतीने स्पर्धेचे नियोजन व आयोजन व्यवस्थितपणे करण्यात आले. शाळेचे संचालक श्री. दिलीपराव काळे सर, मुख्याध्यापक श्री. पांडुरंग रंगनाथ राऊत सर, तालुका संयोजक श्री. कृष्णा धनवट सर तसेच क्रीडा शिक्षक श्री. सोफियान सर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. स्पर्धेच्या आयोजनासाठी शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना योग्य सुविधा उपलब्ध करून देत स्पर्धेचे शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी शिवना येथे विविध शाळांतील विद्यार्थी एकत्र आल्याने शाळेच्या परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते.

# जन्म-मृत्यू नोंदणीचे नियम कडक; वेळीच नोंदणी न केल्यास अडचणी वाढतील

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी, :** जन्म-मृत्यूची नोंद २१ दिवसांच्या आत सक्तीची जन्म किंवा मृत्यूची नोंद वेळेत न केल्यास नागरिकांच्या अडचणी आता वाढणार आहेत. विलंबित नोंदींमधील गैरप्रकार तसेच बनावट

दाखले रोखण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने जन्म-मृत्यू नोंदणीची प्रक्रिया अधिक कडक केली आहे. ऑगस्ट २०२६ रोजीच्या केंद्रीय राजपत्रानुसार जन्म व मृत्यू नोंदणी (सुधारणा) अधिनियम, २०२६ अंतर्गत कलम १३(३) मध्ये महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. सध्या स्थित त्याची अमलबजावणी कार्यालया मार्फत सुरू आहे . जन्म किंवा मृत्यूची नोंद २१दिवसांच्या आत संबंधित नगरपरिषद, नगरपालिकेत करणे आवश्यक आहे

विलंब झाल्यास नोंदणीसाठी अडचणी वाढणार

दरम्यान, १ वर्षपिक्षा अधिक विलंब झाल्यास संबंधितांना तहसीदार यांचे आदेश लागतील व २ वर्षा पेक्षा अधिक कालावधि साठी थेट न्यायालयाची पायरी चढ़ावी लागणार आहे. अशा प्रकरणांत प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांचा आदेश अनिवार्य करण्यात आला आहे. अर्ज, आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करून न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच न्यायालयाच्या आदेशाच्या आधारे संबंधित निबंधकाकडून जन्म किंवा मृत्यूची नोंद करण्यात येईल. खाजगी हॉस्पिटलमध्ये जन्म किंवा मृत्यू झाल्यास संबंधित रुग्णालयाकडून नोंदणी निबंधकाला माहिती पाठविली जाते. मात्र, पालकांनी किंवा नातेवाईकांनी दाखला मिळाल्याची खात्री करणे आवश्यक आहे. नागरिकांनी भविष्यातील वेळ व खर्च टाळण्यासाठी जन्म-मृत्यूची नोद निर्धारित २१ दिवसांच्या मुदतीच्या आत करावी , असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

निर्धारित मुदतीत नोंदणी केल्यास नियमानुसार शुल्क भरावे लागेल. यामुळे आता बनावट वा इतर गैर प्रकारच्या प्रमाणपत्रांना पुर्णपणे आळा बसणार .२१ दिवसांनंतर मात्र एक वर्षाच्या आत नोदणी करण्यासाठी विलंबाचे ठरणार आहे. शासकीय योजनांचा गैरफायदा घेणे, जमिनीचे वाद, किंवा पुराव्यांसाठी तयार केले जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. या नव्या सुधारित कायद्यामुळे अशा बेकायदेशीर प्रकारांना पूर्णपणे नागरिकत्वाच्या अनेकांकडून जन्म-मृत्यूच्या खोट्या नोंदी किंवा बनावट दाखले ना

पायबंद बसणार आहे.

दोन वर्षांच्या कालावधीत नोंदणीसाठी

एक वर्ष नंतर तहसीलदार आपल्या सक्षम अधिका-यांची चौकशी व लेखी आदेश आवश्यक राहणार आहे. त्यामुळे अशा प्रकरणांत नोंदणी भेट करता येणार नाही. एक वर्षाहून अधिक काळ उलटून गेल्यानंतरह. अशा प्रकरणांमध्ये संबंधित तहसीलदार किया नियुक्त सक्षम अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी केली जाईल.

चौकशी अंती समाधान झाल्यासच तहसीलदारांच्या स्वाक्षरीने लेखी आदेश काढले जातील आणि त्यानंतरच स्थानिक प्रशासराला नोंदणी करता येईल.

बनावट दाखले आणि

गैरप्रकारांवर चाप योजना गैरफायदा घेणे, जमिनीचे

वाद नागरिकत्वाच्या पुराव्यांसाठी खोट्या नोंदी किंवा बनावट दाखले तयार केले जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. नव्या सुधारित कायद्यामुळे अशा बेकायदेशीर प्रकारांना पायबंद

बसणार आहे.

वेळेत नोंदणी करा नव्या नियमांमुळे ही प्रक्रिया अधिक क्लिष्ट झाली असल्याने, कोणतीही दिरंगाईन करता नागरिकांनी जन्म किंवा मृत्यूची नोंद २१ दिवसांच्या आतच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नोंदवावी, व प्रमाणपत्र घेऊन जावे असे आवाहन माननीय जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ किशोर सुरवसे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गणेशोत्सवाचा वारसा आता जागतिक डिजिटल संग्रहात; 'bappa.org' वर अनुभव, परंपरा आणि आरती शेअर करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी, :** गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा, भक्ती, संस्कृती आणि लोकजीवनाचा वारसा जगभर पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमांतर्गत 'bappa.org' हे डिजिटल व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. गणेशभक्तांनी या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या बाप्पाशी संबंधित आठवणी, परंपरा, पाककृती आणि आरतीचा ठेवा डिजिटल स्वरूपात जतन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून गणेशोत्सवाशी संबंधित विविध प्रकारची माहिती एका जागतिक डिजिटल संग्रहात संकलित केली जात आहे. नागरिकांना आपल्या जालना जिल्ह्यातील गणेशोत्सवातील अनुभव आणि आठवणी शेअर करण्याबरोबरच घरगुती किंवा सार्वजनिक गणेश मंडळातील आरती रेकॉर्ड करून अपलोड करण्याची संधी मिळणार आहे. तसेच आपल्या गणरायाचे छायाचित्रही या संग्रहात सहभागी करून घेता येणार आहे.

यासाठी नागरिकांनी 'bappa.org' या संकेतस्थळाला भेट देऊन 'माहिती' या पर्यायातून 'तुमची कथा सांगा' या विभागात प्रवेश करावा. येथे *कथा, पाककृती, परंपरा आणि थेट आरती* असे चार पर्याय उपलब्ध आहेत. त्यापैकी आवश्यक पर्याय निवडून संबंधित माहिती भरावी. मोबाईलचे लोकेशन बंद असल्यास पिनकोड क्रमांक नोंदवावा.

'bappa.org' या संकेतस्थळावर गणपती बाप्पाच्या प्रसिध्द आरत्या व भक्तिगीते, गणेशोत्सवाच्या विविध परंपरा आणि नागरिकांचे अनुभव यांचा डिजिटल संग्रह उपलब्ध होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाची सांस्कृतिक ओळख आणि लोकपरंपरा पुढील पिढ्यांसाठी जतन करण्यास मदत होणार आहे. गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या घरातील, परिसरातील आणि मंडळातील गणेशोत्सवाच्या परंपरा 'bappa.org' या संकेतस्थळाच्या माध्यमातून जगासमोर आणाव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत आज लाभार्थी मेळावा

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,:** विश्वकर्मा पूजन दिन तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, परभणी यांच्या वतीने पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत लाभार्थी मेळाव्याचे आयोजन उद्या गुरुवार (दि.17) रोजी करण्यात आले आहे. हा मेळावा विश्वकर्मा सांस्कृतिक सभागृह, जुना पेडगाव रोड, परभणी येथे आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यास जिल्ह्यातील पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत नोंदणीकृत लाभार्थी, बँकेकडून कर्ज मंजूर व वितरित झालेले लाभार्थी तसेच टूल किट (साहित्य संच) प्राप्त झालेले लाभार्थी सहभागी होणार आहेत.पीएम विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून पारंपरिक कारागीर व हस्तकला व्यवसाय करणाऱ्या घटकांना आर्थिक सहाय्य, कौशल्यविकास, आधुनिक साधनसामग्री तसेच बँक कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. जिल्ह्यात योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याच्या दृष्टीने आतापर्यंत झालेल्या प्रगतीचा आढावा घेणे, क्षेत्रीय पातळीवरील लाभार्थ्यांच्या गरजा जाणून घेणे तसेच त्यांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेणे, हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश आहे.

# एकाच छताखाली सर्वसमावेशक आरोग्य सेवा; CPHC प्रशिक्षणाचा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवरगावकर यांनी घेतला आढावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** नागरिकांना घराजवळच वेळेत, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळावी, यासाठी आयुष्मान आरोग्य मंदिराच्या माध्यमातून विविध आरोग्य सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यावर आरोग्य विभागाने भर दिला आहे. या सेवांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य अद्ययावत राहणे आवश्यक असून, त्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र आळंद येथे आयोजित सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा (सीपीएचसी) प्रशिक्षणास अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवरगावकर यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.




आयुष्मान आरोग्य मंदिराच्या माध्यमातून माता-बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांची तपासणी व उपचार, मानसिक आरोग्य, दंत व मुख आरोग्य, ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य सेवा, आयुष-योग तसेच दूरस्थ वैद्यकीय सल्ला अशा विविध सेवा नागरिकांना त्यांच्या परिसरात उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यामुळे प्राथमिक पातळीवरच आजारांचे लवकर निदान आणि वेळेत उपचार करण्यास मदत होत आहे.

आळंद येथील प्रशिक्षणादरम्यान डॉ. आवरगावकर यांनी वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, गटप्रवर्तक आणि आशा स्वयंसेविकांशी संवाद साधून आरोग्य सेवांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. शासनाच्या विविध आरोग्य योजना, कार्यक्रम आणि सेवांची माहिती केवळ प्रशिक्षणापुरती मर्यादित न ठेवता तिचा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात प्रभावी वापर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

नियमित आरोग्य तपासणी, आजारांचे लवकर निदान, वेळेत उपचार, गरजेनुसार संदर्भ सेवा आणि आरोग्यविषयक जनजागृती यावर विशेष लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे त्यांनी सांगितले.

आरोग्य सेवा केवळ आजार झाल्यानंतर उपचार करण्यापुरती मर्यादित न ठेवता प्रतिबंधात्मक आणि प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांवरही भर देणे गरजेचे आहे. नागरिकांशी सातत्याने संवाद साधून प्रत्येक कुटुंबापर्यंत आरोग्य सेवांची प्रभावी पोहोच निर्माण करण्याची गरज डॉ. आवरगावकर यांनी व्यक्त केली.

सीपीएचसी प्रशिक्षणातून मिळणारे ज्ञान आणि कौशल्ये प्रत्यक्ष कामात वापरून नागरिकांना अधिक सक्षम, सुलभ आणि सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा देण्याचा उद्देश यावेळी अधोरेखित करण्यात आला.

प्रशिक्षणासाठी डॉ. सुनंदा घोलप, डॉ. विजया सोनवणे, पुष्कर दहिवाळ, प्रफुल्ल ताकवाले, सखू शेलार, वर्षा डोमळे, सावरगावे आणि डॉ. महेश मारकड यांनी मार्गदर्शन केले.

# खंडणीखोरांवर कठोर कारवाई; वारंवार गुन्हेगारांना MPDAचा दणका

## ‘सुरक्षित उद्योग’साठी पोलिसांचे प्रतिबंधात्मक पाऊल; उद्योजकांना बळजबरीच्या वर्गणीला बळी न पडण्याचे आवाहन





हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** गंगापूर आणि एमआयडीसी पैठण औद्योगिक परिसरातील वाढती गुंतवणूक आणि कामगारांची संख्या लक्षात घेता उद्योगांची सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी ग्रामीण पोलिसांनी उद्योग व्यवस्थापनासोबत थेट समन्वय साधण्यास सुरुवात केली आहे. उद्योगांकडून खंडणी मागणे, बळजबरीने वर्गणी वसूल करणे, धमकी देणे अथवा कंपनीच्या कामकाजात अडथळा आणणाऱ्यांवर तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली जाईल. वारंवार गुन्हे करणाऱ्यांवर MPDA कायद्यान्वये स्थानबद्धतेची कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी दिला.

एमआयडीसी पैठण येथील अजिंता फार्मा कंपनीच्या सभागृहात बुधवारी (दि. १६) ‘उद्योग-पोलीस समन्वय’ बैठक झाली. गंगापूर आणि एमआयडीसी पैठण परिसरातील राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे संचालक, व्यवस्थापकीय अधिकारी, प्लांट हेड, सुरक्षा प्रमुख, औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी, एमआयडीसी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

जाधव यांनी सांगितले की, औद्योगिक विकासासाठी सुरक्षित वातावरण अत्यावश्यक आहे. त्यामुळे पोलिसांकडून घटना घडल्यानंतरची कारवाई करण्यापेक्षा ‘प्रतिबंधात्मक पोलिसिंग’वर भर दिला जाणार आहे. संभाव्य गुन्हे व समस्या आधीच ओळखून उपाययोजना करणे, उद्योग व्यवस्थापनाशी नियमित संवाद ठेवणे आणि तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी समन्वय यंत्रणा मजबूत केली जाणार आहे.

**उत्सवांच्या काळातील बळजबरीला आळा**

जयंती अथवा विविध उत्सवांच्या काळात उद्योगांकडून बळजबरीने वर्गणी मागण्याचे प्रकार घडल्यास त्याकडे दुर्लक्ष केले जाणार नाही. खंडणी, धमकी, दबाव किंवा कंपनीच्या कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई केली जाईल. उद्योजकांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता अशा घटनांची तातडीने पोलिसांना माहिती देऊन रीतसर तक्रार दाखल करावी, असे आवाहन जाधव यांनी केले.

**उद्योगांच्या सुरक्षेसाठी CCTV, RFIDवर भर**

प्रत्येक औद्योगिक आस्थापनात उच्च प्रतीचे १०० टक्के CCTV कव्हरेज, पुरेसा डेटा बॅकअप आणि आवश्यकतेनुसार संबंधित पोलीस ठाण्याला Live Access उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. RFID आधारित प्रवेश नियंत्रण, भंगार चोरी, अनधिकृत प्रवेश आणि वाहन चोरी रोखण्यासाठी सक्षम सुरक्षा यंत्रणा उभारण्याचे निर्देशही देण्यात आले.

परराज्यांसह विविध ठिकाणांहून रोजगारासाठी येणाऱ्या कामगारांची चारित्र्य पडताळणी तातडीने पूर्ण करून त्यांची माहिती स्थानिक पोलिसांना देण्याच्या सूचना करण्यात आल्या. रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक ठिकाणी पोलीस गस्त आणि गरजेनुसार महिला पोलिसांची मदत उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा झाली.

सायबर गुन्हे, अतिक्रमणे, वाहतूक समस्या, औद्योगिक अपघात, बंद उद्योगांची सुरक्षा, डार्क स्पॉट्स तसेच स्थानिक शेतकरी-उद्योजकांमधील समन्वय या विषयांवरही बैठकीत चर्चा झाली. अतिक्रमणांवर संबंधित विभागांच्या समन्वयातून संयुक्त कारवाई आणि अपघात रोखण्यासाठी संयुक्त कृती आराखडा तयार करण्यावर भर देण्यात आला.

बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील, पैठणचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, एमआयडीसी पैठणचे प्रभारी अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक भरत मोरे यांच्यासह पोलीस अधिकारी, उद्योग प्रतिनिधी व कंपनी व्यवस्थापनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# तुमच्या सूचनेतून बदलणार भरती परीक्षेची दिशा; २१ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे महत्त्वाची बैठक

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

भरती परीक्षा पद्धतीतील सुधारणा अधिक परिणामकारक करण्यासाठी विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा क्लास चालक-मालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था आणि संबंधित घटकांनी आपले अनुभव व सूचना मांडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आगामी २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात या महत्त्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून, सहआयुक्त मंजूषा मिसकर यांनी जास्तीत जास्त संबंधितांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे. या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयात आठही जिल्ह्यांतील टास्क फोर्सचे नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक पार पडली, ज्यामध्ये विभागीय माहिती कार्यालयाचे माहिती उपसंचालक प्रवीण टाके देखील उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड व हिंगोली या आठही जिल्ह्यांतील विद्यार्थी, परीक्षार्थी, पालक, शिक्षक, अभ्यासिका चालक व शैक्षणिक संस्थांनी भरती परीक्षेचा प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेऊन ठोस सूचना द्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. नागरिकांच्या सोयीसाठी १८ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आठही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांत विशेष कक्ष कार्यरत राहणार आहेत. या कक्षात नागरिकांना आपल्या सूचना, शिफारसी, हरकती व निवेदने प्रत्यक्ष सादर करता येणार आहेत.

ज्या नागरिकांना प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य होणार नाही, त्यांच्यासाठी csn-ex-amreformstaskforce@maharashtra.gov.in या ई-मेलवर अभिप्राय पाठवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्राप्त झालेल्या ई-मेल व निवेदनांचे १७ सप्टेंबरपर्यंत वर्गीकरण करून १८ व १९ सप्टेंबर रोजी संबंधितांना भेटीसाठी वेळ देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बैठकीला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता असल्यामुळे स्मार्ट सिटी कार्यालयात नोंदणी, टोकन, गटनिहाय प्रवेश, योग्य आसन व्यवस्था, पिण्याचे पाणी, चहापान आणि कडक सुरक्षा व्यवस्थेचे योग्य नियोजन करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

या सुधारणा प्रक्रियेत प्रामुख्याने प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते निकालापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया, प्रश्नपत्रिकेची सुरक्षितता, परीक्षा केंद्र व्यवस्थापन, डिजिटल व बायोमेट्रिक प्रणाली, सीसीटीव्ही यंत्रणा, मूल्यांकन पद्धती, तक्रार निवारण यंत्रणा तसेच पेपरफुटी व गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्याबाबतच्या विविध महत्त्वपूर्ण सूचना अपेक्षित आहेत. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि क्षेत्रातील जाणकारांचा प्रत्यक्ष अनुभव सुधारणांसाठी अत्यंत मोलाचा ठरणार असल्याने २१ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या बैठकीत सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपले विचार मांडण्याचे आवाहन पुन्हा एकदा सहआयुक्त मंजूषा मिसकर यांनी केले आहे.

# मुक्तिसंग्राम दिनाच्या ध्वजारोहणाची तयारी पूर्णत्वाकडे

## सिद्धार्थ उद्यानात स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी घेतला तयारीचा आढावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी सिद्धार्थ उद्यान येथे होणाऱ्या ध्वजारोहण कार्यक्रमाच्या तयारीला वेग आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार असल्याने कार्यक्रमाच्या व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी बुधवारी सिद्धार्थ उद्यान येथे स्थळ पाहणी केली.




यावेळी कार्यक्रमाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या विविध तयारीची पाहणी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. ध्वजारोहण कार्यक्रम सुरळीतपणे पार पडावा, यासाठी उद्यान परिसरातील स्वच्छता, व्यवस्था तसेच अन्य आवश्यक बाबींचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रमस्थळी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

स्थळ पाहणीवेळी नगरसेवक सुरेंद्र कुलकर्णी, जालिंदर शेंडगे, रवी कावडे, मनोज गांगवे, पदमसिंग राजपूत, उद्यान अधीक्षक विजय पाटील, वार्ड अधिकारी रमेश मोरे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# डाक जीवन विमा योजनेसाठी सोमवारी मुलाखती

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** परभणी डाक विभागामार्फत डाक जीवन विमा आणि ग्रामीण डाक जीवन विमा योजनेंतर्गत विमा सल्लागार पदासाठी उमेदवारांच्या थेट मुलाखती घेण्यात येणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरून सोमवार (दि.२१) रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत अधीक्षक डाकघर, परभणी विभाग, परभणी-४३१४०१ येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

या पदासाठी उमेदवाराचे वय मुलाखतीच्या दिवशी किमान १८ वर्षे असणे आवश्यक आहे. अर्जदाराने केंद्र अथवा राज्य शासनाची मान्यता असलेल्या मंडळाची इयत्ता १० वी उत्तीर्ण किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

बेरोजगार किंवा स्वयंरोजगार व्यक्ती, माजी विमा सल्लागार, कोणत्याही विमा कंपनीचे माजी विमा एजंट, माजी सैनिक, सेवानिवृत्त शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्ते, महिला मंडळ कार्यकर्ते, ग्रामप्रधान, ग्रामपंचायत सदस्य यांनाही अर्ज करता येतील.

उमेदवारांची निवड थेट मुलाखतीद्वारे करण्यात येणार असून, त्यामध्ये व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्त्व, जीवन विम्याबाबतचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान तसेच स्थानिक भागाची माहिती आदी बाबींचा विचार करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारास ५ हजार रुपये अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून जमा करावी लागेल. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर डाक विभागाकडून तात्पुरत्या स्वरूपात परवाना देण्यात येईल. त्यानंतर आयआरडीएची परवाना परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर हा परवाना कायमस्वरूपी परवान्यात रूपांतरित करण्यात येईल. सदर परीक्षा तीन वर्षांच्या आत उत्तीर्ण करणे अनिवार्य राहील. ही नियुक्ती लायसन्स व कमिशन तत्त्वावर राहणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी डाकघर अधीक्षक कार्यालय, परभणी विभाग, परभणी येथे उपलब्ध असलेला विहित नमुन्यातील अर्ज भरून, बायोडाटा, मूळ कागदपत्रे, आवश्यक प्रमाणपत्रे तसेच अनुभव प्रमाणपत्रे सोबत घेऊन दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी कार्यालयीन वेळेत थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन डाकघर अधीक्षक यांनी केले आहे.

# हेरिटेज वॉकमध्ये उजळली ‘मुक्तिसंग्राम गाथा’; 100 हून अधिक नागरिकांचा सहभाग

## 21व्या वर्षी शहीद झालेल्या वसंत राक्षसभुवनकरांच्या आठवणीने वातावरण भावूक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** ऐतिहासिक दस्तऐवज, निजामकालीन नाणी आणि मुक्तिसंग्रामाच्या आठवणींमधून हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा इतिहास उलगडत ‘शहरनामा’च्या हेरिटेज वॉकने नागरिकांना इतिहासाशी जोडले. हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त सिद्धार्थ उद्यानातील मराठवाडा मुक्तिसंग्राम संग्रहालयात आयोजित या उपक्रमात १०० हून अधिक नागरिक सहभागी झाले. मुक्तिसंग्रामात अवघ्या २१व्या वर्षी शहीद झालेल्या वसंत राक्षसभुवनकर यांच्या भावाने सांगितलेल्या आठवणींनी यावेळी उपस्थितांचे डोळे पाणावले.



इतिहास व पुरातत्त्व विभाग, एमजीएम विद्यापीठ, आख्यान फाउंडेशन, गरवारे कम्युनिटी सेंटर, अ‍ॅडगाइड मीडिया प्रा. लि., केंद्रीय पर्यटन विभाग आणि ‘टीम शहरनामा’ यांच्या संयुक्त विद्यमाने हा हेरिटेज वॉक घेण्यात आला. सिद्धार्थ उद्यानातील स्मृतिस्थळाला पुष्पहार अर्पण करून उपक्रमाची सुरुवात झाली. इतिहास अभ्यासक डॉ. भागवत वाघ यांनी ‘आजच्या परिप्रेक्ष्यातून मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास’ या विषयावर मार्गदर्शन केले.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातून निर्माण झालेल्या राष्ट्रवादी चळवळीचा हैदराबाद मुक्तिसंग्रामावर प्रभाव पडला. राष्ट्रवादाची भावना ग्रामीण भागापर्यंत पोहोचत गेली. निजामाचे प्रशासन संस्थानातील जनतेसाठी अन्यायकारक होते. संस्थानची प्रशासकीय भाषा उर्दू असल्याने मराठी, तेलुगू आणि कानडी भाषिक जनतेला भाषिक अडचणींचा सामना करावा लागत होता. स्थानिक नेतृत्व आणि विविध संघटनांच्या माध्यमातून या अन्यायाविरोधात लढा उभारला गेला, असे डॉ. वाघ यांनी सांगितले.

महाराष्ट्र परिषद सुरुवातीला भाषिक आधारावर उभी राहिली. पुढे याच प्रक्रियेतून हैदराबाद स्टेट काँग्रेसची निर्मिती झाली. आर्य समाज, हिंदू महासभेचे सत्याग्रह तसेच विविध क्रांतिकारकांचे योगदान या लढ्यात महत्त्वाचे ठरले. मुक्तिसंग्रामासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांच्या शौर्यगाथेचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

**दस्तऐवज, नाण्यांतून इतिहासाचा उलगडा**

हेरिटेज वॉकदरम्यान संग्रहालयातील विविध ऐतिहासिक दस्तऐवज आणि संदर्भांची माहिती नागरिकांना देण्यात आली. श्रीप्रकाश पुरवार यांच्या संग्रहातील विशेष ऐतिहासिक दस्तऐवज नागरिकांना पाहता आले.

# सराला बेटावर सामूहिक हनुमान चालिसाचे पठण

## धर्म, संस्कृती आणि संस्कारांच्या जनजागृतीचा संकल्प

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आजच्या पिढीमध्ये धर्म, संस्कृती आणि संस्कारांची जपणूक व्हावी, तसेच युवकांनी धार्मिक व सामाजिक कार्यात सहभागी व्हावे, या उद्देशाने विश्व हिंदू परिषद, करणी सेना आणि सकल हिंदू समाजाच्या वतीने श्री सराला बेट येथे सामूहिक हनुमान चालिसा पठणाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महंत रामगिरी महाराज यांनी डॉ. जीवन राजपूत यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा व आशीर्वाद दिले.



गेल्या काही महिन्यांपासून डॉ. जीवन राजपूत यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील विविध गावांमध्ये दर मंगळवार आणि शनिवारी सामूहिक हनुमान चालिसा पठणाचे आयोजन केले जात आहे. या माध्यमातून धार्मिक तसेच सामाजिक जनजागृती केली जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. गावोगावी अशा उपक्रमांमधून हिंदू धर्मातील एकता, संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्याचा प्रयत्न होत असल्याचे सांगत महंत रामगिरी महाराज यांनी उपक्रमाचे कौतुक केले. हिंदू समाजातील एकता आणि संस्कृती अबाधित ठेवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. जीवन राजपूत यांनी युवकांना मोबाईलच्या अतिवापरासह विविध व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. युवकांनी आपला वेळ सकारात्मक कार्यासाठी देत धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये योगदान वाढवावे, असे त्यांनी सांगितले. हिंदू संस्कृती आणि परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सण-उत्सव मोठ्या उत्साहात आणि एकत्रितपणे साजरे करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. कुटुंबातील सदस्यांनी एकत्र येऊन धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहनही डॉ. राजपूत यांनी केले. कार्यक्रमास ह.भ.प. रोहित महाराज कचनेरकर, करण जोनवाल, साई उरेकर, आनंद नागरे, महेश भोपळे, गणेश हिवाळे, राजू महेर, नारायण शिहिरे, जयसिंग राजपूत, विजयसिंग लोधवाल, रणजित बेडवाल, सचिन शहाणे यांच्यासह परिसरातील अनेक भक्तगण उपस्थित होते. सामूहिक हनुमान चालिसा पठणामुळे सराला बेट परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. धर्म, संस्कृती, संस्कार आणि हिंदू समाजातील एकतेचा संदेश गावोगावी पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# मुक्ती संग्रामाचा इतिहास लेखनातून जपणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास विद्यार्थ्यांना अवगत व्हावा आणि या ऐतिहासिक लढ्याची माहिती पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून मनपा माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय भेटीचे आयोजन करण्यात येत आहे. आतापर्यंत सहा शाळांमधील विद्यार्थ्यांनी संग्रहालयाला भेट दिली असून, बुधवारी मनपा माध्यमिक शाळा मिटमिटा आणि बेगमपुरा येथील विद्यार्थ्यांनी संग्रहालयाची पाहणी केली.



संग्रहालय भेटीनंतर आयुक्त अमोल येडगे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा कालखंड, या लढ्यात सहभागी झालेले थोर नेते आणि स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित विविध घटनांबाबत विद्यार्थ्यांकडून प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून माहिती जाणून घेतली.

**लेखनातून इतिहास समजून घेण्याचा उपक्रम**

संग्रहालय भेटीत विद्यार्थ्यांना मिळालेली माहिती त्यांनी त्याच दिवशी सायंकाळी लेखी स्वरूपात तयार करून संबंधित शिक्षकांकडे जमा करावी, असे आयुक्त येडगे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी संग्रहालयात पाहिलेली माहिती स्वतःच्या शब्दांत मांडावी, यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. उत्कृष्ट माहिती लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी उपायुक्त अंकुश पांढरे, उपायुक्त विकास नवाळे, उद्यानप्रमुख विजय पाटील, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, सांस्कृतिक अधिकारी सर्वेश नांद्रेकर, क्रीडा अधिकारी संजीव बालया, क्रीडा समन्वयक सागर मगरे तसेच संबंधित शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911